पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत मान्यवर.

## शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर :** अण्णा भाऊ साठे आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रामध्येही प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते बॅ. खर्डेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. रणधीर शिंदे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर; डॉ. एस. व्ही. थोरात आदी उपस्थित होते.

03 AUG 2022
लोकमत
जनसंपर्क क
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गगनबावड्यात आढळला 'कॅलिओफिस कॅस्टो' सर्प

## जिल्ह्यातील दुसरी नोंद : शिवाजी विद्यापीठातील अभ्यासकाचे संशोधन

**संदीप आडनाईक**

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली येथे सापडणाऱ्या "कॅलिओफिंस कॅस्टो" या अत्यंत दुर्मिळ सापाची दुसरी नोंद कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावड्यातून करण्यात आली आहे. गगनबावडा येथील शिवाजी विद्यापीठाचे निसर्ग अभ्यासक सचिन कांबळे यांच्या या नव्या संशोधनामुळे या जिल्ह्यातील या सापाच्या अधिवासात भर पडली असून, सरीसृप तज्ज्ञ डॉ. वरद गिरी यांनी या सापाची ओळख पटवली. सापाच्या या अधिवासामुळे पश्चिम घाटातील गगनबावड्याचीही समृद्ध जैवविविधता ठळक झाली आहे.




बंगलोरमधील वन्यजीव अभ्यासक प्रवीण एच. एन. आणि शिवाजी विद्यापीठात प्राणीशास्त्राचा विद्यार्थी सचिन कांबळे (गगनबावडा) यांनी ही नोंद केली. "हमदर्याद" या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामधे ही नोंद प्रसिद्ध झाली आहे. यापूर्वी ही नोंद सरीसृपतज्ज्ञ डॉ. वरद गिरी आणि सहकाऱ्यांसोबत २०१३ मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली येथून केली होती.

कोल्हापूर जिल्ह्यांतील गगनबावडा येथील सांगशी येथे २८ जून २०२० रोजी सचिन कांबळे यांना हा सर्प जमिनीखाली आढळला. यापूर्वी या सापाची पाहिली नोंद आजऱ्यातून मयूर जाधव आणि सहकाऱ्यांनी केली होती. सरीसृप तज्ज्ञ डॉ वरद गिरी यांनी हा सर्प "कॅलिओफिस कॅस्टो" प्रजातीमधील असल्याचे स्पष्ट केले. त्याला रुजबेह गझदार आणि अनुज शिंदे यांनी दुजोरा दिला आहे.

एकरंग नसलेला, सडपातळ शरीर, डोक्यावर नारिंगी पट्टी आणि शेपटीच्या खालच्या बाजूने एकसमान केशरी रंगाच्या आधारे याला कॅलिओफिस कॅस्टो म्हणून ओळखले गेले. याची एकूण लांबी ८० सेमी होती. घरच्या बागेत खड्डा खोदताना दोन फूट खाली मोकळ्या मातीत हा साप आढळला. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो आपली शेपूट गुंडळून घेतो.

**- वरद गिरी**, सरिसृप तज्ज्ञ.

### १५ पैकी पाच प्रजाती भारतात

"कॅलिओफिस कॅस्टो" या वंशामध्ये सध्या १५ मान्यताप्राप्त प्रजाती आहेत. त्यापैकी भारतात पाच प्रजाती आढळतात. यापूर्वी २००० मध्ये पहिली नोंद झाली होती. क्वचितच दिसणारे, हे भारतातील काही सर्वात कमी ज्ञात असलेले साप आहेत.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे ५१ विषयांच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रांतर्गत विद्यापीठस्तरावरील परीक्षांतर्गत सोमवारी ५१ विषयांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ४२ हजार ३२३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने महाविद्यालय, विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षांना प्रारंभ झाला आहे.

तरूण भारत

# विद्यापीठात अण्णाभाऊ साठे जयंती

**कोल्हापूर :** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. रणधीर शिंदे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.